REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# कामगारांच्या दुःख- वेदना काव्यमय करणारा कवी : नारायण सुर्वे

**डॉ.मधुकर श्रीरंग पवार**
**(मराठी विभाग प्रमुख)**
**छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालय,सोलापूर.**

**प्रस्तावना :-**



दलित कवितेतून अभिव्यक्त होणारी भावना ही वैयक्तिक दुःख मांडणारी होती. त्यामुळे कवितेतील आशयाची विविधता प्रत्ययाला आली. दलित कवीत कवी नारायण सुर्वे यांचे नाव अग्रक्रमाने येते, त्यांची कविता नव्या जाणिवांना जन्म देणारी होती. कवी नारायण सुर्वे यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९२६ रोजी झाला, आपल्या कवितेच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित, गरीब, दलित, कामगार अशा वर्गामध्ये जगत असलेल्या असंख्य लोकांच्या असाह्य वेदनांचे प्रतिनिधित्व करणारी कविता, म्हणून यांची कविता सर्वत्र ओळखली गेली. सुर्वे यांच्या जन्मानंतर ते अनाथ झाले. यांच्या मातापित्यांनी त्यांना मुंबईच्या रस्त्यावर सोडून दिले. मुंबईच्या इंडिया वुलन गिरणीमध्ये कामगार असलेल्या गंगाराम सुर्वे व यांची कामगार असलेली पत्नी काशीबाई यांनी या अनाथ मुलाला जवळ केले. हे दाम्पत्य मूळचे कोकणातील हेताचीवाडी भुईबावडा येथील होते. गंगाराम सुर्वे यांनी नारायण सुर्वे यांना जन्मापासून आपल्या मुलाप्रमाणे सांभाळले, आणि आपले नाव ही दिले. नारायण सुर्वे यांचे बालपण अत्यंत वाईट अवस्थेत व्यतित झाले. उपहारगृहात कामगार आणि कापड गिरणीत बिगारी म्हणून, यांनी काम केले. थोडी अक्षरांची ओळख झाल्यावर यांनी शाळेत शिपाई म्हणून नोकरी केली, कसेतरी सातवी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पुढे मात्र यांना प्राथमिक शाळेत शिक्षकांची नोकरी मिळाली. अगदी पहिल्यापासूनच यांना भाषेची व साहित्याची आवड होती. उर्दु व हिंदी या भाषा चांगल्या येत होत्या. व पुढे १९४८ साली कृष्णाबाई साळुंके यांच्या बरोबर सुर्वेचा विवाह झाला.

नारायण सुर्वे यांची जन्मापासूनच, परवड झाल्यामुळे समाज दुःखाची जाणिव काय असते? हे प्रारंभापासूनच यांनी अनुभवली होती. कवितेसारखा वाड्.मय प्रकार यांनी आत्मसात केला कारण, आपल्या जाणिवा, दुःख, वेदना आणि विद्रोह अगदी कमी शब्दात,पण कठोरतेणे, सडेतोड-प्रखरपणे मांडता येतात असे त्यांना वाटले असावे, तसे पाहिल्यास कवीला यात पूर्णतः यश प्राप्त झाले आहे. १९६० नंतरच्या आधुनिक मराठी साहित्य प्रवाहात नव्याने मिसळलेल्या दलित साहित्याचा प्रवाह मराठी वाचकावर मोठा परिणाम करणारा ठरला. या दलित साहित्यातून नव्या जाणिवा, नवे अनुभव यांच्या दुःखाची वेदना पाहायला मिळते. म्हणून दलित साहित्याला आणि त्यात दलित कवितेला फार मोठी लोकप्रियता लाभली असून मराठीच नव्हे तर सर्वच वाचकांनी अशा कवितांचे मनापासून स्वागत केले. यात पहिल्या काही महत्त्वाच्या कवीमध्ये कवी नारायण सुर्वे यांचे आग्रहाने नाव घ्यावे लागते. उदा. नामदेव ढसाळ, बाबुराव बागुल, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, या सारखे आणखी काही कवी आहेत.

नारायण सुर्वे यांना गंगाराम सुर्वे यांनी प्राथमिक चौथी पर्यंतचे शिक्षण दिले होते. त्या नंतर मात्र स्वःताचे शिक्षण त्यांनी स्वःताहाच घेतले अर्थात काम करुन ते शिकले. वेळप्रसंगी अगदी हीनकस जीवन अनुभवले, त्यामुळेच सुर्वे यांची विचारसृष्टी अशा अनुभतीवरच पोसली गेली. यातूनच १९६२ साली 'ऐसा गा मी ब्रह्म' हा पहिला काव्य संग्रह प्रकाशित झाला. यानंतर सुर्वे हे महाराष्ट्रात चिंचपोफळी येथे राहात असताना यांनी प्रसिध्द असलेल्या कवितांचा संग्रह १९६६ साली 'माझे विद्यापीठ' दुसरा कवितासंग्रह प्रकाशित केला, हा काव्यसंग्रह अधिक लोकप्रिय झाला या पुस्तकाला एकून अकरा पारितोषिक मिळाली. यानंतर मराठी कवी म्हणून यांचा सर्वत्र लौकिक वाढला.यानंतर १९७५साली 'जाहिरनामा' तर १९९५ साली 'नव्या माणसाचे आगमन' आणि 'सनद'असा यांच्या कवितांचा प्रवास झाला. याप्रमाणे कृष्ण चंदर यांच्या उर्दु कथांचा सुर्वे यांनी 'तीन गुंड आणि सात कथा' मराठीत अनुवाद केला. 'दादर पुलाकडील मुले'

ही त्यांची पहिली अनुवादीत कादंबरी होती. सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये म्हणजे दैनदिन गरजेसाठी व आपला हक्क व अस्तित्वासाठी झगडणारा माणूस सुर्वे यांच्या कवितेतील अनुभवसृष्टीच्या मध्यवर्ती असलेला माणूस होता उदा. आफ्रिकनचाचा, टांगेवाला, शीग कबाबवाला, याकूब नालबंधवाला, संपकरी, पोष्टर डकवणारा इसल्या शिंदे, देहविक्रय करणाऱ्या वेश्या अशा उपेक्षित समाजात जगणाऱ्या घटकांचे, अर्थात तळागाळातील दलित समाजमनाचे चित्रण करणारी ही कविता आहे. कवितेची भाषा, अभिव्यक्तीची स्वतंत्र पध्दतीची असल्यामुळे किवा यांच्या कवितेत उपेक्षित समाजाच्या बोलीतील भाषा या समाजाला कळतिल असे शब्द येत असल्यामुळे यांची कविता वाचकांना भावस्पर्शी वाटू लागली. 'चुलाण्यात फटफटावे लाकूड तसा आत्मा' 'तुमचच नाव लिवा' असे शब्दप्रयोग येतात. लढणाऱ्या प्रत्येक माणसाशी नव्या काळातही यांची कविता आपली नाळ जुळवत राहते असे वाटते. व लढण्याची प्रेरणा देते.

कवी सुर्वे यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्ये म्हणजे संवादमय शैली होय. पारंपरिक प्रतिमा- प्रतिकांपेक्षा नव्या प्रतिमा-प्रतिकांचा वापर कवीनी केला आहे. उदा.'विचार'या कवितेत तिसऱ्या पाळीवरुन आलेल्या गळून गेलेल्या कामगारासारखे शब्द सुध्दा असेच थकून गेले आहेत असे कवी म्हणतात. या संबंधी कवी कुसुमाग्रज म्हणतात,'कामगारांच्या जगात वाढलेला, त्यामधूनच स्फूर्ती घेतलेला आणि त्यांच्याच व्यथा-वेदना, आशा-आकांशा,राग-लोभ, व्यक्त करणारा कवी हीच मराठी काव्यसृष्टीतील सुर्वे यांची ओळख ठरली,अंधारात बकाल जीवन जगणारे पण प्रकाशाकडे झेपावण्याची जीद्द बाळगणारे, देवदैवतांची उपसना करणारे पण रोजच्या जीवनात संग्रमासाठी एक पाऊल उंबरठ्याबाहेर ठेवणारे, प्रस्थापित नीतिमत्तेचे जोखड झुगारुन देणारे शाश्वत नीतिधर्म मानणारे असे हे सरहद्दीवरचे जग नारायण सुर्वे यांच्या कवितेत प्रथमच बोलू लागले.' या कवितेतून कवीच्या अनुभवाला कवीनी विशेष महत्त्व दिले आहे.

## नारायण सुर्वेच्या कवितेतून येणारी वेदना –

आजपर्यंत मराठी कवितेचे आलेले विषय आणि सुर्वे यांच्या कवितेतेतून अभिव्यक्त झालेले विषय हे भिन्न भिन्न आहेत. कारण मराठी कवितेत आलेले बाह्यविश्व अशा पध्दतीने कधीही व्यक्त झाले नव्हते. हा अनुभव वेगळा आहे असे जाणवू लागले. कवीचे जग हे कामगारांचे कष्टकऱ्याचे होते. केवळ जगण्यासाठी ज्यांना रोजच संघर्ष करावा लागतो, अशा माणसांचे जग कवीला महत्त्वाचे वाटले. कवीच्या कवितेतेतून कारखाण्यात काम करणारे कामगार,ओझे वाहणारे हमाल, पोष्टर डकवणारी मुले, अशा वेगवेगळ्या ठिकाणी काम करणारे, बकाल जीवन जगणारे यांचे दर्शन कवितेतून घडते. रोजी रोटीचा प्रश्न कवीला महत्त्वाचा वाटत नाही 'आणखी काही' हवे आहे. यावरुन माणूस म्हणून माणसासारखे जगण्याची आशा कवी व्यक्त करतात. अशी वेदना कवीची आहे. कविमनातील स्वप्न व बाह्यजग यांच्यामध्ये असा विरोधी ताण निर्माण झाला की सर्वसामान्यपणे दोन प्रतिक्रिया संभवतात आणि त्या कविमनावर आधारलेल्या असतात. मनातील स्वप्न आणि प्रत्यक्ष वास्तव या विरोधाहून कवितेत कधी निराशावादी सूर प्रकट होतो. तर कधी आशावादी सूर उमटतो. कविची कवितेतील वेदना मनाला पिळवटून टाकणारी आहे. 'असा कसा दगड झालो, बाप असून काळ वाटलो त्यांना' मनच आत्मक्लेषी झाले तर, मग स्वःतावरच प्रेम उरत नाही. असा आत्मक्लेषी माणूस बायको, मुलाबाळावर प्रेम कसे करणार,ही जाणिव वेदनेचीच आहे. 'आमुची दुनिया,' 'माफ करा,' 'झेप''इशारा'अशा कवितेत ही जाणिव स्पष्ट होते.'येतेस दमून, गलबलून जातो तेव्हा,सत्य'या कवितेत कष्टकऱ्याचे जग आणि याबाहेरील सुखवस्तू जग यातील फरक कवी स्पष्ट करतात. यातून कष्टकऱ्यांच्या जगात असणारी संघर्षशीलता वास्तवाला थेट भिडण्याची वृत्ती, कष्टकऱ्याच्या, कामगारांच्या जगात सदैव वावणारी उदासिनता, अशा कामगारांच्या जगातील मानवी भावजीवनांचे दर्शन कवी घडवतात, ते त्यांचे अनुभव विश्व होते. प्रस्थापित कवीच्या कवीतेत येणारा चंद्र, तारे आकाश, हे सुर्वे यांच्या कवितेत येतात पण विरोध दर्शवीणारी भूमिका घेऊन, 'भाकरीचा चंद्र शोधण्यात सारी जिंदगी बरबाद झाली' असा अनुभव कवी सांगतात. सर्वस्व असणारे पण दारिद्र्याकडेच गहाण असणारे हात या सारख्या विरोधी कल्पनांतून निर्माण होणारे भाव पहिल्या दोन ओळीशी संवादी आहेत. अशा रीतीने कवितेच्या या पहिल्या ओळीतून कष्टकऱ्यांच्या वेदनांचा अनुभव येतो .आर्थिक विषमतेमुळे समाजात निर्माण झालेले वर्ग, अशा कनिष्ठ वर्गातील गरीब मुलींना समाज कसा स्वीकारणार यांचे लग्नाचे वय निघून गेले, अशा मूलींचा सामाजिक प्रश्न कवीला पडतो 'डोळे भरुन आले; चाळिसावे संपले, शांतपणे तिने माळलेले गजरे खिडकीखाली सोडून दिले अशी दुःखाची भावना कवी व्यक्त करतात.

## निष्कर्ष :-

कामगारांच्या दुःखांना बोलते करण्याचे काम कवी नारायण सुर्वे यांनी केले. त्यांनी पाहिलेले स्वप्नसुध्दा कीती अवास्तव आहेत याची जाणिव कवीला आहे. दररोज उद्याच्या सुखाची वाट पाहून हा वर्ग हताश झाला असल्याची भावना कवी व्यक्त करतात.

## संदर्भ :-

१. जाधव रा.ग. - निळी पहाट

२.  निबांळकर वामन – दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती
३.  सुर्वे नारायण - माझे  विद्यापीठ
४.  मेश्राम केशव - उत्थानन